| | |
|---|---|
| | **दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड**<br>**वडमुखवाडी ता हवेली जि पुणे.** |
| | प्रेसनोट दिनांक २१/११/२०२३ |

**दिघी पोलीस ठाणे तपास पथकाकडुन मोटारसायकल चोरी करणारा सराईत गुन्हेगार अटक करुन त्याचेकडुन ३,५५,०००/- रुपये किमतीच्या सात मो/सायकल जप्त केलेबाबत...**

---

दिघी पोलीस ठाणे मधील रामदास मुकणे पो.हा.ब.नं. ९११ यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम चोरीची मोटार सायकल दाभाडे सरकार चौकाचे पुढे चऱ्होली बायपास रोड, चऱ्होली बु//, ता. हवेली, जि. पुणे याठिकाणी घेवून येणार आहे, अशी माहिती मिळताच त्यांनी त्याबाबत मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो., दिघी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड यांना कळवून त्यांचे मार्गदर्शनाखाली पोउनी भंडारे, पो हवा ९११ मुकणे, पो हवा ७१३ फलके, पो हवा ९५३ विंचू, पो हवा १०२० कांबळे, पो हवा ८०१ पोटे यांनी सापळा लावुन इसम नामे मनोज मेहतर सोंदरकर, वय ४० वर्षे, व्यवसाय-बिगारी, रा. मरकळ, ता. खेड, जि. पुणे यास त्याचेकडील ड्रीम युगा मो/सायकल सह ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याच्या ताब्यातील मो/सायकल ही दिघी पोलीस ठाणे गु. रजि नं. १९०/२०२२ भा. द. वि कलम ३७९ यातील चोरीस गेलेली मो/सायकल असुन आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने सदरची गाडी बाबा मिस्त्री याचेकडुन विकत घेतल्याचे समजले आरोपीच्या मो/नंबरचे तांत्रिक विश्लेशन करुन इसम नामे नासिर ऊर्फ बाबा मिस्त्री शमशुद्दीन शेख, वय ३६ वर्षे, रा पगडेवस्ती, मराठी शाळेजवळ, चऱ्होली खु// ता हवेली जि पुणे यास पगडे वस्ती आळंदी येथुन ताब्यात घेवुन त्यास नमुद गुन्हयात अटक करुन त्याचेकडे तपास केला असता आरोपीकडे खालील एकुण ०६ मो/सायकल मिळुन आल्या असुन त्या जप्त करण्यात आल्या आहेत.

**<u>अटक आरोपी यांचेकडुन खालील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.</u>**

१) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं. १९०/२०२२ भा.द.वि कलम ३७९, ४११, ३४ मधील २५,०००/- रू. कि. ची होंडा ड्रीम युगा मोटार सायकल नं. एम.एच-१४-ई.जी-५०४६

२) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं २६०/२२ भादवी कलम ३७९ मधील ५०,०००/- रु किमतीची पॅशन प्रो. मोटार सायकल एम.एच-१४-ई.के-०७९७

३) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं १०३/२३ भादवी कलम ३७९ मधील ६०,०००/- रु किमतीची एक युनिकॉर्न मोटार सायकल एम.एच-१२-एफएच -८६८९ इंजीन

४) दिघी पोलीस ठाणे गुरक्रं ५९९/२३ भादवी कलम ३७९ मधील ५०,०००/- रु किमतीची एक होंडा पॅशन मोटार सायकल एम.एच-१४-बी.डी-३०८२

५) भोसरी पोलीस ठाणे गुरक्रं ७५८/२३ भादवी कलम ३७९ मधील ५५,०००/- रु किमतीची एक एचएफ डिलक्स मोटार सायकल एम.एच-१४-के.एक्स-४८९४

६) पिंपरी पोलीस ठाणे गुरक्रं १११०/२३ भादवी कलम ३७९ मधील ५५,०००/- रु किमतीची एक होंडा शाईन मोटार सायकल एम.एच-१२-एन.आर-०३८५

७) सांगवी पोलीस ठाणे गुरक्रं ५८८/२३ भादवी कलम ३७९ मधील ६०,०००/- रु किमतीची एक हिरो होंडा पॅशन प्लस मोटार सायकल एम.एच-१४-बी.एन.३५८१.

---------एकुण ३,५५,०००/- रुपये.

सदरच्या कारवाईत एकुण ३,५५,०००/- रुपये किमतीच्या ०७ मोटारसायकल जप्त करुन सात गुन्हे उघड करण्यात आले असुन गुन्हयातील आरोपी १)नासिर ऊर्फ बाबा मिस्त्री शमशुद्दीन शेख, वय ३६ वर्षे, रा पगडेवस्ती, मराठी शाळेजवळ, चऱ्होली खु// ता हवेली जि पुणे २) मनोज मेहतर सोंदरकर, वय ४० वर्षे, व्यवसाय-बिगारी, रा.

मरकळ, ता. खेड, जि. पुणे यांना अटक करण्यात आली असून आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहे. सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

सदरची कारवाई श्री. संदिप डोईफोडे मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ ०३, श्री. विवेक मुगळीकर मा. सहायक पोलीस आयुक्त, भोसरी एमआयडीसी विभाग, श्री. मच्छिंद्र पंडित वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिघी पोलीस ठाणे, श्री दशरथ वाघमोडे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली दिघी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी पोउपनी आर.बी.भंडारे, पोउपनि एस.एम. भदाणे व अंमलदार पोहा ७१३ फलके, पोहा ८०१ पोटे, पोहा ९५३ विंचु, पोहा ९११ मुकणे, पोहा १०२० कांबळे, पोहा ११६८ जाधव, पोहा १५७२ जाधव, पोशि २०९४ जाधव, पोशि ३५५३ कसबे व पोशि ३३९१ भोसले यांनी केली आहे.

(मच्छिंद्र पंडीत)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दिघी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड